नि.फौ.ख. क्र. १८६/२०१७
निशाणी क्र. ३०

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ३ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** - नासिर खान नादीर खान पठाण
**वय** - ५६ वर्षे, **व्यवसाय** – चालक
**ह.मु.** - बाभळेश्वर, ता. राहाता, जि. अहमदनगर.

**सरतपास सरकारतर्फे सहा. सहकारी अभियोक्ता श्रीमती ए. एस. महाले यांच्या मार्फत सुरु -**

मी सन २०१७ मध्ये बाभळेश्वर येथील देशी दारुचे दुकानात वॉचमन म्हणुन कामास होतो. दि. १९.०५.२०१७ रोजी मी रात्री वॉचमनचे काम करीत असताना रात्री २.१५ वा. सुमारास मला एक अनोळखी इसम संशयतरित्या फिरताना दिसला. मी त्याबद्दल पोलीसांना माहिती दिली. माझे नाव नासिर खान नादीर खान पठाण असुन ते जबाबामध्ये नासिर नादीरखान शेख असे नमुद झाले आहे. देशी दुकानाचे समोरील बाजुस असलेल्या टपरीजवळ तो संशयीत इसम मला दिसला. ती टपरी कणसे नावाच्या व्यक्तीची होती. त्यावेळी पोलीसांनी तेथे येवुन त्याला पकडले होते व त्याला पोलीस घेऊन गेले. या व्यतिरिक्त मला घटनेबाबत काही माहिती नाही. मी फिर्यादी कणसे यांनाही फोन करुन बोलावुन घेतले होते कदाचित त्यांनी फिर्याद दिली असेल मला त्याबाबत माहिती नाही. माझ्या समक्ष पोलीसांनी त्या अनोळखी व्यक्तीकडे काही चौकशी केली नाही. घटनेच्या वेळी कणसे यांची टपरी फोडल्याचे मला माहित झाले. मला कणसे यांनी सिगरेट पॉकेट वैगेरे माल चोरीला गेल्याचे सांगितले होते. पोलीसांनी माझा जबाब नोंदवला नव्हता. मी आरोपीला ओळखु शकतो. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर नाही.

***(साक्षीदार अभियोगपक्षाला समर्पक उत्तरे देत नसल्यामुळे सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदाराला उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात येत आहे).***

२. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी आरोपी सिगरेटचे पाकिटे व इतर माल चोरुन घेऊन जात होता व त्या दिवशी मी त्याला पकडले व त्याच्याकडे सदर माल मिळुन आला. हे म्हणणे खरे आहे की आरोपीला पकडल्यावर तो गावातील गोट्या उर्फ अरुण हा व्यक्ती होता असे मला कळाले. घटनेच्या वेळी लोक जमा झाले होते किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपीच्या ताब्यातुन रक्कम रु. ७०३५/- चा माल मिळुन आला. पोलीसांनी तेथे पंचनामा केला होता. कणसे यांनी चोरीची फिर्याद दिली होती. आता मला माझ्या जबाबातील रेखाकिंत भाग अ व ब मधील मजकुर वाचुन दाखविण्यात आला. सदर मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे नोंदविला नाही, पोलीसांनी तो तसा का नोंदवला आहे त्याचे कारण मी सांगु शकत नाही. मी आता चालक म्हणुन काम करतो. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला वाचविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**नि.फौ.ख. क्र. १८६/२०१७**
**निशाणी क्र. ३०**

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपासणी आरोपींकरिता अधिवक्ता श्री. ए.बी. पाळंदे यांचे मार्फत सुरु -</u>**
**उलटतपास नाकारला.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

PANKAJ RAMDAS PHULARI
Digitally signed by PANKAJ RAMDAS PHULARI
Date: 2026.02.03 13:12:44 +0530

राहाता
**(पंकज रा. फुलारी)**
दिनांक - ०३.०२.२०२६
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, राहाता.